मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक २४ जानेवारी २०२४ । पान १

# जरांगे पाटील यांच्या स्वागताची तयारी पूर्ण

## मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाज व शेकडो मंडळे करणार स्वागत

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मनोज जरांगे पाटील यांच्यासह लाखों मराठा बांधव आंदोलनासाठी मुंबईकडे निघाले आहेत. सर्व आंदोलक बुधवार दिनांक २४ रोजी मार्गे पदयात्रेने शहरात दाखल होत आहेत. पिंपरी चिंचवड शहरात सांगवी फाटा येथे विविध संघटना व सार्वजनिक मंडळ जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत करणार आहेत. यानंतर रक्षक सोसायटी चौक येथे पिंपळे निलख ग्रामस्थ तसेच जगताप डेअरी चौकामध्ये रहाटणी व पिंपळे सौदागरचे ग्रामस्थ काळेवाडी फाटा येथे काळेवाडी चे ग्रामस्थ व विविध मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात येणार आहे. सोळा नंबर बस स्टॉप थेरगाव येथे मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड व संतोष मंगल कार्यालयाचे सचिन बारणे व विविध मित्र मंडळ मोठ्या उत्साहात स्वागत करून अन्नदान तसेच पाणी वाटप करणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या डांगे चौक थेरगाव येथील पुतळयास पुष्पहार अर्पण करून जरांगे पाटील अभिवादन करणार आहेत. काळेवाडी फाटा



ते बिर्ला हॉस्पिटल रोडवर शेकडो मंडळी व सामाजिक संघटना थेरगाव ग्रामस्थ वाकड ग्रामस्थ ताथवडे ग्रामस्थ यांच्या वतीने स्वागत करणार आहेत. याप्रसंगी सर्वच मंडळे अन्नदान वाटप फळे वाटप पाणी चहा वाटप करणार आहेत चिंचवडे लॉन्स वाल्हेकरवाडी कॉर्नर चिंचवड येथे चिंचवड ग्रामस्थ सकल मराठा समाज मराठा क्रांती मोर्चा व विविध मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात येणार आहे चिंचवडगाव येथील चाफेकर पुतळा चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद साळवे व वासुदेव बळवंत फडके यांच्या पुतळ्यास जरांगे पाटील अभिवादन करणार आहेत.आकुर्डी ग्रामस्थांच्या वतीने जरांगे पाटील यांचे ढोल ताशांच्या गजरात फुले उधळून स्वागत करण्यात येणार आहे याप्रसंगी खंडोबा मंदिरात जरांगे पाटील यांच्या हस्ते आरती होणार आहे. भक्ती शक्ती समोर शिल्प छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराजांना जरांगे पाटील अभिवादन करून लोणावळा कडे मार्गस्थ होणार आहेत. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून मंगळवारी रात्री हजारो मराठा बांधव पदयात्रेत सामील होण्यासाठी आलेले आहेत त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था सकल मराठा समाजाच्या वतीने संतोष मंगल कार्यालय थेरगाव चिंचवडे लॉन्स चिंचवड आणि खंडोबा मंदिर ट्रस्ट मंगल कार्यालय येथे करण्यात आली आहे. यासाठी संतोष मंगल कार्यालयाचे सचिन बारणे, चिंचवडे लॉन्सचे दौलत खंडूशेठ चिंचवडे आणि आकुर्डी ग्रामस्थ यांनी बहुमूल्य सहकार्य केले आहे. आरोग्य सुविधा-खाजगी हॉस्पिटल्स व महानगरपालिका वैद्यकीय विभागाच्या वतीने ॲम्ब्युलन्स तसेच मोफत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

# बोऱ्हाडेवाडीतील सदनिकाधारकांची पाण्यासाठी वणवण

## टँकरसाठी लाखोंचा भूर्दंड, नागरिकांचा संताप

**मनीषा थोरात-पिसाळ**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

बोऱ्हाडेवाडी परिसरात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत १२८८ सदनिकांचा गृहप्रकल्प साकारला आहे. या प्रकल्पातील नागरिकांना ताबा देण्यासाठी घाई केली, मात्र अधर्वट कामांमुळे डोकेदुखी झाली आहे. महापालिका प्रशासन आणि प्रधानमंत्री आवास योजना विभाग यांच्यात ताळमेळ नसल्याने अर्धवट स्थितीत सदनिकाधारकांना चाव्या सुपूर्द केल्या. रितसर पाण्याचे नळ कनेक्शन नसल्याने सदनिका धारकांना सुमारे दीड लाखांचा भूर्दंड पाण्याच्या टँकरचा आला आहे. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. लवकरात-लवकर पाणी इतर समस्या न सोडल्यास आंदोलन करू असा इशाराही त्यांनी दिला आहे. पाण्याची खूप मोठी समस्या मागील तीन महिन्यांपासून आहे.

> प्रधानमंत्री आवास योजना विभागाच्या माध्यमातून तात्पुरते दीड इंचाचे नळकनेक्शन घेतले आहे. हे कनेक्शन अनधिकृत असून, अधिकृत करण्यासाठी रितसर प्रोसेस करणे आवश्यक आहे. नळ कनेक्शनसाठी डिपॉझिट भरल्यानंतर अधिकृत तीन किंवा चार इंचाचे कनेक्शन मिळेल.
>
> –शेखर गुरव, उपअभियंता क प्रभाग पाणीपुरवठा



> एक लाख पंधरा हजार लीटर पाणी प्रत्येक दिवशी, प्रत्येक विंगसाठी टाकीत पडले पाहिजे. मात्र त्याठिकाणी २५००० लीटर पाणी मिळते. पाणी अपुरे पडत असल्याने टँकरने पाणीपुरवठा सदनिकाधारकांना सुरु आहे. पाणी पुरेसे मिळण्यासाठी अजून एक लाईन घ्या असे अधिकाऱ्यांचे म्हणने आहे. प्रकल्प महापालिकेचा आहे, मग त्यांनी हे नियोजन करणे आवश्यक होते. अनेक गोष्टी अधर्वट पाण्याच्या टँकरमुळे प्रत्येक सदस्यांच्या खिशाला कात्री लागते आहे. त्यामुळे नागरिक हैराण आहेत.
>
> –सुनील साळवी, सदस्य



> उन्हाळा सुरु होण्याआधीच पाण्याची ऐवढी टंचाई सुरु आहे. गृहप्रकल्पाच्या चाव्या मिळाल्यापासून पाण्याची टंचाई सुरु आहे. दीड इंचाचे कनेक्शन दिले आहे. त्यात पाणी फोर्सने येत नाही. अधिकारी तीन इंचाचे कनेक्शन घ्या म्हणून सांगतात, मात्र पाणी पुरेशा दबावाने नसल्यास काय उपयोग होणार. सध्या गृहप्रकल्पातील सदनिकाधारकांना स्वत:च्या खिशातून पैसे काढून टँकरने पाणी विकत आणावे लागते आहेत. पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना पाणी पुरेशा दाबाने द्यावे यासाठी पाठपुरावाही केला आहे.
>
> –स्वप्नील उत्तेकर



> पाण्याची टंचाई तीव्र असल्याने कामे कशी करावी. आम्ही सर्वसामान्य नागरिक असल्याने टँकरसाठी खर्च करण्यास आम्हाला परवडत नाही. मागील तीन महिन्यांपासून पाण्याची समस्या आहे. लवकर समस्या नाही सोडवल्यास अधिकाऱ्यांच्या इथे जाऊन ठिय्या मांडू.
>
> –वैशाली कापडणीस



> बोऱ्हाडेवाडीतील पंतप्रधान आवास योजनेचा प्रकल्प साकारला आहे. सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे. त्यानुसार प्रकल्प साकारला असून, सप्टेंबर २०२३ मध्ये सदस्यांना चाव्या दिल्या आहेत. मात्र त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहेत.त्यामध्ये महत्त्वपूर्ण म्हणजे पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात येत आहे.त्यामध्ये माझ्या महिलावर्गाची पाण्याविना फरपट होते आहे. संबधिंत विभागाच्या अधिकाऱ्यांनी येत्या पाच दिवसांत निर्णय न घेतल्यास महिला-भगिनींसह हंडा मोर्चा काढू.
>
> –सारिका बोऱ्हाडे, माजी नगरसेविका

# मोशीतील कुमार प्रिन्सविले सोसायटीत अवतरले प्रभू रामचंद्र

## साक्षात प्रभू अवतरल्याचे पहायला मिळाले चित्र

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
अवध मे राम पधारे हैराम सिया राम चे भजनरांगोळीच्या पायघड्या,१हजार ५१ दिव्यांनी उजळलेल्या परिसरफटाक्यांची आतषबाजीभगव्या पताका, गुढ्या असे चैतन्यमय वातावरण कुमार प्रिन्सविले फेज २ मध्ये पहायला मिळाले. साक्षात प्रभू रामचंद्र अवतरल्याचे चित्र पहायला मिळाले. इतिहासातील अविस्मरणीय धार्मिक क्षण अबालवृध्दांसाठी यादगाव व्हावा यासाठी सोसायटीमध्ये विविध धार्मिक उपक्रम घेण्यात आले. चिमुकल्यांनी प्रभू श्रीराम, सीतामैय्या, लक्ष्मण, हनुमान अशा वेशभूषा परिधान करून रामायणाचे सादरीकरण केले. महाआरती, होमहवन, महाप्रसाद असे सर्व नियोजन सोसायटीच्या माध्यमातून करण्यात आले होते.




### एक हजार ५१ दिव्यांची सजावट

**» जयश्रीराम या नावावर एक हजार ५१ दिवे लावून संपूर्ण परिसर उजाळून टाकला होता. दिव्यांच्या लख्ख प्रकाशाने संपूर्ण परिसर चैतन्यमय झाला होता. कुमार प्रिन्सविले सोसायटीतील सर्व सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सणोत्सव साजरा केला.**


# भंगार दुकान बंद करण्यासाठी रहिवाशांची सह्यांची मोहीम!

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आकुर्डी (प्रभाग क्रमांक १४) निवासी भागातील धोकादायक भंगार मालाचे दुकान कायम स्वरूपी बंद करण्यासाठी स्थानिक व्यापारी व रहिवाशांनी सह्यांची मोहीम राबवली आहे. याबाबत सह्यांचे पत्र पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांना दिले आहे. विठ्ठल प्रतिष्ठानचे अध्यक्ष निखिल दळवी म्हणाले, "आकुर्डीमधील (प्रभाग क्रमांक १४) या मुख्य रस्त्यावर सिद्धेश्वर क्लासिक इमारतीसमोर एक भंगाराचे दुकान आहे. या भंगार दुकानात नुकताच रात्री साडेसात वाजता स्फोट होऊन मोठी आग लागली. त्यानंतर किमान चार स्फोट झाले. या आगीमध्ये चार कामगार आणि नागरिक जखमी झाले आहेत. वस्तुतः या भंगार दुकानाशेजारी सिएरा झेरॉक्स, शेजारी समर्थ कॉम्प्लेक्स, मागे बंडेवार बिल्डिंग, गिराम बिल्डिंग, कोरडे बिल्डिंग इतकी वसाहत आहे. जर ही आग अधिक पसरली असती तर एवढ्या सर्व परिसराला झळ बसली असती. अवैद्य हातभट्टी दारूचा व्यवसाय करणे, जुगार अड्डा चालविणे इत्यादी गैरधंदे राजरोसपणे चालतात. हे सर्व धंदे शेजारील बिल्डिंग वरून दिसतात. तेथे दारू पिऊन धिंगाणा, मारामारी ही नित्याचीच बाब झाल्याने सर्व नागरिक त्रस्त आहेत. म्हणूनच तेथील रहिवासी व व्यापारीच्या सह्यांचे निवेदन या पूर्वी २१ जून २०२३ व ८ ऑगस्ट २०२१ असे दोनदा दिले होते. मात्र, गेल्या तीन वर्षात काहीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे. या पूर्वीचे पत्र व कालची आगीची घटना पाहता ते भंगार दुकान त्वरित बंद करावे, अन्यथा पुढील दुर्घटना झाल्यास जबाबदार कोण? हा प्रश्न अनुत्तरित राहील.

# उन्नती सोशल फाऊंडेशनकडून राम शोभा यात्रेचे आयोजन

## रामरक्षापठण व तदनंतर महाप्रसादाचा रामभक्तांनी घेतला लाभ

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
सकल हिंदू समाज आणि पिंपळे सौदागर स्थित उन्नती सोशल फाऊंडेशन यांच्या द्वारे रविवार , दि.२१ जानेवारी रोजी भव्य राम शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेचा प्रारंभ कोकणे चौक येथून झाला. भव्य ९ फुटी राम मूर्ती त्यासोबतच १०१ ध्वज सनातन हिंदू धर्माची भव्यता दाखवत होती . पारंपरिक वेशभूषेत नटलेले स्त्री-पुरुष रामभक्त यांनी वातावरणात रामभक्तीची जणू लाट अवतरली होती . कोकणे चौक – शिवार चौक – कुणाल आयकॉन रोड – मार्गे उन्नती सोशल फाउंडेशन कार्यालय येथे यात्रेची समाप्ती झाली . भव्य राम यात्रेनंतर , महाआरती , रामरक्षापठण व तदनंतर महाप्रसादाचा रामभक्तांनी लाभ घेतला .राम यात्रेमागील भूमिका विशद करताना , उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ.कुंदाताई भिसे म्हणाल्या , ५०० वर्षांची कलंकित गुलामगिरी नष्ट होऊन , श्री राम जन्मभूमी अयोध्या येथे प्रभू श्रीराम चंद्र विराजित होत आहे . ही देशाच्या इतिहासातील ऐतिहासिक घटना आहे . ही उत्सव भव्यदिव्य प्रमाणात साजरा व्हावा यासाठी ही भव्य राम यात्रा आयोजित करण्यामागील मानस आहे . आमदार अश्विनीताई जगताप , म्हणाल्या प्रभू श्रीरामांच्या दिव्य आगमनामुळे संपूर्ण भारत देशच राममय झाला आहे . अश्या प्रकारच्या औलोकिक घटना क्वचितच एकदा घडतात . त्यामुळे अश्या घटना तेवढ्याच उत्साहाने साजऱ्या करायला हव्यात . सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या उन्नती सोशल फाऊंडेशने भव्य दिव्य रामयात्रेचे आयोजन करुन सर्व रामभक्तांना आनंदाची एकप्रकारे पर्वणीच प्रदान केली आहे . पिंपरी चिंचवड भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी देखील रामशोभा यात्रेत उपस्थिती दर्शवली . उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे त्यांचा प्रभू श्रीरामाची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला . याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, पी.के. स्कूलचे संस्थापक जगनाथ आप्पा काटे, नगरसेविका निर्मला कुटे, जयनाथ काटे ,भानुदास काटे – पाटील ,प्रकाश झिंझुर्डे , बाळासाहेब काटे , राजू भिसे , विजय भिसे , सोमनाथ काटे , मल्हारी कुटे , ह.भ.प. शेखर काटे , संदीप विठ्ठल काटे , कुटे , अण्णा शेलार , सुरेश कुंजीर , उन्नती सोशल फाऊंडेशनचे सदस्य , जेष्ठ नागरिक संघाचे तसेच , विठाई जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य, आनंद हास्य क्लब चे सदस्य आणि पदाधिकारी आणि पिंपळे सौदागर , रहाटणी परिसरातील रहिवासी सोसायट्यांमधील चेअरमन , कमिटी मेंबर आणि रामभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जरांगे यांची पदयात्रा पुण्यात दाखल!

## मराठा समाजाच्या सर्वेक्षणाचा पुण्यात पहिल्याच दिवशी फज्जा

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाच्या वतीने राज्यात सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यासाठी गोखले इन्स्टिट्यूटकडील मुख्य प्रशिक्षकांमार्फत (मास्टर ट्रेनर) प्रशिक्षण देण्यात आले. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सुमारे दहा हजार प्रगणकांमार्फत बुधवारी सकाळी प्रत्यक्षात सर्वे क्षणाला सुरुवात झाली. सकाळच्या सत्रात सॉफ्टवेअर चांगली सुरू होते, मात्र, दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास राज्यभरात एकाचवेळी संगणकप्रणाली वापरात आल्याने सर्व्हर डाऊन झाला.सर्वेक्षणाचे काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करायचे नियोजन आहे. त्यासाठी ग्रामीण भागात तालुकास्तरावर १५ नोडल अधिकारी, १५ सहायक नोडल अधिकारी, ४६६ पर्यवेक्षक आणि ६५९६



प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात सुमारे साडेतीन हजार प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. बुधवारी प्रत्यक्षात सर्वेक्षणासाठी प्रगणकांनी काम सुरु केले. मात्र, सर्वे क्षण सुरु होताच दुपारी बारा वाजल्यापासून सर्व्हर डाऊन झाला, मोबाइल ॲपमधील काही ऑप्शन उघडले जात नव्हते. परिणामी सर्वे क्षणाचा पहिल्याच दिवशी फज्जा उडाला. याबाबतच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाल्या. याबाबतची माहिती मागासवर्ग आयोगाला देण्यात आली. त्यानुसार सर्व्हरमध्ये सुधारणा केली जात असल्याचे कळवण्यात आले. मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वे क्षणाचा मंगळवारी पहिला दिवस होता. एकाचवेळी संगणकप्रणाली वापरात येत असल्याने सर्वेक्षणाचे काम संथगतीने मात्र सुरू होते, असे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी सांगितले.मराठा आरक्षण आता अंतिम टप्प्यात असून या लढाईसाठी सर्वांनी मोठ्या संख्येने मुंबईत यावे आणि मराठा समाजाने आपल्यातील एकजूट कायम ठेवावी, असे आवाहन मराठा आरक्षण क्रांती योद्धे मनोज जरांगे यांनी मंगळवारी केले. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे ही आमची आग्रही मागणी असल्याचे यांनी सांगितले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवली सराटी येथून मुंबईकडे रवाना होत असलेल्या मनोज जरांगे यांच्या पदयात्रेचे शिरूर येथील सतराकमानीचा पुलाजवळ भव्य असे स्वागत करण्यात आले. मोठ्या क्रेनद्वारे त्यांना पुष्पहार घालण्यात आला. त्यानंतर प्रभू श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केल्यानंतर जरांगे यांनी संवाद साधला.जरांगे म्हणाले की समाजाचा प्रगतीसाठी आणि लेकरांच्या भविष्यासाठी शहाणपणाची भूमिका घ्यावी लागेल. शरीर साथ देत नसताना जातीसाठी, समाजासाठी जीवाची ही पर्वा न करता आंदोलन करत आहे. मराठ्यांचा ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना शासनाने ओबीसीचे प्रमाणपत्र द्यावे. शेवटच्या मराठाला आरक्षण मिळेपर्यंत आपण हटणार नाही. आरक्षण अंतिम टप्प्यात असून ही संधी सोडू नका. आपल्यातील एकजूट कायम ठेवा. मराठे एकत्र आले तर ही जात प्रगत होईल आणि कोणापुढे हात पसरण्याची वेळ ही येणार नाही. आरक्षणाने लेकरांचे आयुष्यभराचे कल्याण होईल. मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने मुंबईत दिसतील.इतक्या वर्षात जाणूनबुजून मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटू दिला नाही. मराठा एक होऊ नये म्हणून प्रयत्न झाले. आता मात्र समाज एकजूट होत आहे. आंतरवलीमधून निघाल्या पासून विविध गावांतील लोक ठिकठिकाणी स्वागत करत आहे. जरांगे म्हणाले की समाजाचा प्रगतीसाठी आणि लेकरांच्या भविष्यासाठी शहाणपणाची भूमिका घ्यावी लागेल. शरीर साथ देत नसताना जातीसाठी, समाजासाठी जीवाची ही पर्वा न करता आंदोलन करत आहे. मराठ्यांचा ५४ लाख नोंदी सापडल्या आहेत. त्यांना शासनाने ओबीसीचे प्रमाणपत्र द्यावे. शेवटच्या मराठाला आरक्षण मिळेपर्यंत आपण हटणार नाही. आरक्षण अंतिम टप्प्यात असून ही संधी सोडू नका. आपल्यातील एकजूट कायम ठेवा. मराठे एकत्र आले तर ही जात प्रगत होईल आणि कोणापुढे हात पसरण्याची वेळ ही येणार नाही. आरक्षणाने लेकरांचे आयुष्यभराचे कल्याण होईल. मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने मुंबईत दिसतील.मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाच्या वतीने राज्यात सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यासाठी गोखले इन्स्टिट्यूटकडील मुख्य प्रशिक्षकांमार्फत (मास्टर ट्रेनर) प्रशिक्षण देण्यात आले.

# सरकारला विचारण्याची ३८ खासदारांमध्ये हिंमत नाही

## कांद्याला भाव द्या म्हणून सरकारला विचारण्याची हिम्मत नाही : खा. सुळे

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महाराष्ट्रातील गप्प बसलेले ३८ खासदार मला सभागृहाबाहेर चांगला प्रश्न उपस्थित केला म्हणून कौतुक करतात.परंतु त्यांच्यामध्ये शेतक-यांच्या कांद्याला भाव द्या म्हणून सरकारला विचारण्याची हिम्मत नाही, असा निशाणा खा. सुप्रिया सुळे यांनी विरोधकांवर साधला. निरा (ता.पुरंदर) येथील व्यापारी व डॉक्टर यांच्याशी खा. सुळे यांनी संवाद साधला.

या वेळी निरेच्या सरपंच तेजश्री काकडे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष माणिकराव झेंडे, लक्ष्मणराव चव्हाण, संभाजीराव झेंडे, विजय कोलते, दत्तात्रय चव्हाण ,बबूसाहेब माहुरकर, पुष्कराज जाधव, उपसरपंच राजेश काकडे, चंदरराव धायगुडे , डॉ.वसंत दगडे, डॉ.सतीश खलाटे, पृथ्वीराज चव्हाण, राजेंद्र जैन, शांतिकमार कोठडिया यांच्यासह व्यापारी, डॉक्टर, ग्रामस्थ उपस्थित होते. खा.सुळे म्हणाल्या की,



निरा गावातील लोकांचे राहणीमान कसे वाढेल तसेच आर्थिक परिस्थिती व बाजारपेठ कशी वाढेल यासाठी प्रयत्न करणार आहे. या वेळी संदीप धायगुडे यांनी निरा येथील व्यापार वाढीसाठी निरा बाजार समितीत कांदा व गुळाचा मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू करावा तसेच जेजुरी एमआयडीसीत रोजगारासाठी जाणा-या व येणा-या कामगारांच्या सोईकरिता पीएमटी सेवा सुरू करावी. रस्त्यावर रेल्वेच्या हद्दीत भुयारी मार्ग करण्याबाबत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करावा. महाराष्ट्रातील गप्प बसलेले ३८ खासदार मला सभागृहाबाहेर चांगला प्रश्न उपस्थित केला म्हणून कौतुक करतात. तसेच उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरू करावे आदी मागण्या मांडल्या. निरा बाजार समितीचे संचालक राजकुमार शहा यांनी निरागाव गावठाण नसल्याने राष्ट्रीयीकृत बँकेकडून व्यापा-यांना कर्ज मिळत नसल्याने निरा गावठाण करण्याची मागणी केली. डॉ.राम रणनवरे यांनी निरा येथे रक्तपेढी सुरू करण्याची मागणी केली. जि.प.शाळेचे शिक्षक नवनाथ गायकवाड यांनी निरा येथील जि.प.शाळेच्या बांधकामासंदर्भातील अनुदानाबाबत असलेल्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणी सोडविण्याची मागणी केली. या वेळी सरपंच तेजश्री काकडे व उपसरपंच राजेश काकडे यांनी ग्रामस्थांच्या वतीने खा.सुप्रिया सुळे यांचा सत्कार केला.

# पुण्यातील काँग्रेसच्या उमेदवारांचे सर्वेक्षण सुरू

## ‘या’ तारखेपर्यंत होणार उमेदवार निश्चित

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे लोकसभेसाठी इच्छुकांकडून नावे मागविण्यात आली होती. त्यानुसार राष्ट्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर या नावांबाबतचा सर्वेक्षण सुरू झाले आहे. ही प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होईल, त्यानंतर उमेदवाराच्या नावाची घोषणा केली जाईल, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची पश्चिम महाराष्ट्रासाठी बैठकीपूर्वी नाना पटोले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारवर टीका केली.पुणे लोकसभेसाठी काँग्रेसकडून वीस इच्छुकांनी नावे दिली आहेत. त्यातच कसबा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीतील



नेत्यांची भेट घेतली होती. त्यामुळे धंगेकर लोकसभेसाठीचे उमेदवार असतील का, अशी विचारणा पटोले यांच्याकडे करण्यात आल्यानंतर त्यांनी उमेदवारांच्या नावाबाबत पक्ष पातळीवर सर्वेक्षण सुरू असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, राष्ट्रीय पातळीवर उमेदवारांबाबतचे सर्वे क्षणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रदेश पातळीवरीही ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सर्वेक्षण पंधरा फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होईल. त्याचा अहवाल तयार करण्यात आल्यानंतर सक्षम उमेदवाराच्या नावाची घोषणा केली जाईल.मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले आहे. त्यांना आंदोलन करावे लागते, हे सरकारचे पाप आहे. राज्य सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार आहे, असे विरोधात असताना देवेंद्र फडणवीस सांगत होते. मात्र आता ते सत्तेत आहेत तर मराठा समाजाला आरक्षण का देत नाहीत. जरांगे पाटील यांचे आंदोलन मुंबईत पोहोचले तर कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा प्रश्न सरकारने तातडीने सोडविणे आवश्यक आहे.राज्यातील सरकार वेड्यांचे सरकार आहे. मात्र लोक सरकारला वेड ठरवित आहेत. मराठा आणि ओबीसी समाजात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे. बहुमत असूनही आरक्षणाचा मुद्दा सरकारला सोडविता आलेला नाही, असे पटोले यांनी सांगितले.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची

### इच्छुकांकडून मागविण्यात आली नावे


**» प्रदेश पातळीवरीही ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सर्वेक्षण पंधरा फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होईल. त्याचा अहवाल तयार करण्यात आल्यानंतर सक्षम उमेदवाराच्या नावाची घोषणा केली जाईल.पुणे लोकसभेसाठी इच्छुकांकडून नावे मागविण्यात आली होती. त्यानुसार राष्ट्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर या नावांबाबतचा सर्वेक्षण सुरू झाले आहे. ही प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होईल, त्यानंतर उमेदवाराच्या नावाची घोषणा केली जाईल, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसची पश्चिम महाराष्ट्रासाठी बैठकीपूर्वी नाना पटोले यांनी पत्रकारांशी संवाद साधला.**

पश्चिम महाराष्ट्रासाठी बैठकीपूर्वी नाना पटोले यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारवर टीका केली.पुणे लोकसभेसाठी काँग्रेसकडून वीस इच्छुकांनी नावे दिली आहेत. त्यातच कसबा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीतील नेत्यांची भेट घेतली होती. त्यामुळे धंगेकर लोकसभेसाठीचे उमेदवार असतील का, अशी विचारणा पटोले यांच्याकडे करण्यात आल्यानंतर त्यांनी उमेदवारांच्या नावाबाबत पक्ष पातळीवर सर्वेक्षण सुरू असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, राष्ट्रीय पातळीवर उमेदवारांबाबतचे सर्वे क्षणाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

# तलाठी भरती परीक्षेची अंतिम निवड यादी जाहीर!

## आठ लाख ६४ हजार ९६० उमेदवारांनी दिली परीक्षा

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यातील बहुचर्चित तलाठी परीक्षेतील उमेदवारांची निवड यादी मंगळवारी रात्री उशिरा भूमी अभिलेख विभागाकडून जाहीर करण्यात आली. या परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली होती. अंतिम निवड यादीची प्रतीक्षा होती. त्यानुसार मंगळवारी रात्री उशिरा ही अंतिम यादी जाहीर करण्यात आली.




तलाठी भरती परीक्षा १७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत तीन टप्प्यात ५७ सत्रांमध्ये घेण्यात आली. या परीक्षेत तलाठी पदासाठी राज्यभरातून दहा लाख ४१ हजार ७१३ परीक्षार्थींनी अर्ज दाखल केले होते. यापैकी आठ लाख ६४ हजार ९६० उमेदवारांनी परीक्षा दिली. परीक्षेची उत्तरसूची प्रकाशित करून उमेदवारांना प्रश्न किंवा उत्तरसूचीबाबत काही आक्षेप, हरकती असल्यास त्या नोंदविण्यासाठी २८ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत मुदत देण्यात आली होती. संपूर्ण परीक्षेत एकूण प्रश्नांपैकी २८३१ प्रश्नांवर १६ हजार २०५ आक्षेप उमेदवारांकडून नोंदविण्यात आले होते. या आक्षेपांपैकी एकूण वैध १४६ प्रश्नांसाठी घेतलेले ९०७२ आक्षेप परीक्षा घेणाऱ्या टीसीएस कंपनीकडून योग्य ठरविण्यात आले. त्यानुसार सामान्यीकरण पद्धतीने परीक्षेमध्ये ४८ उमेदवारांना २०० पेक्षा जास्त सामान्यीकृत गुण मिळाल्याचे दिसून आले.दरम्यान, परीक्षेत घोटाळा झाल्याचा आरोप स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसह राजकीय संघटनांनी केले आहेत. मात्र, हे आरोप, दावे फेटाळत भूमी अभिलेख विभागाने गुणवत्ता यादीनंतर यशस्वी उमेदवारांची यादी तयार करण्याचे काम सुरू केले होते.